
REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 9 | ISSUE - 3 | DECEMBER - 2019

# साठोत्तरी मराठी ग्रामीण कादंबरीतील दुष्काळ चित्रण : विविधता आणि वेधकता

प्रा.डॉ.भगवान नन्नावरे
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख,
अण्णासाहेब गुंडेवार महाविद्यालय, नागपूर.




**KEY NOTE :** साठोत्तरी ग्रामीण साहित्यातून दुष्काळाविषयी समग्र चिंतन प्रकट करणारी ग्रामीण कादंबरी विचारप्रवृत्त करते.

**ABSTRACT :** मराठी ग्रामीण कादंबरीतून साठोत्तरी ग्रामीण समाजात उद्‌भवणाऱ्या दुष्काळाच्या समस्येचे परिणामासकट झालेले चित्रण विचार प्रवृत्त करणारे आहे. वर्तमानात या समस्येला कादंबरीकारांनी अधिक ठळक स्वरूपात मांडण्याची गरज निर्माण झाली आहे.

## प्रास्ताविक :

मानवी समाजजीवनाचा व्यापक पट कवेत घेणारा व वर्तमानात अधिक लोकप्रिय झालेला साहित्यप्रकार म्हणून कादंबरी या साहित्यप्रकाराची ओळख निर्माण झालेली आहे. आधुनिक साहित्यनिर्मितीच्या कालखंडात कादंबरी लेखनाची एक परंपरा मराठी साहित्यात निर्माण झाली आणि ती उत्तरोत्तर अधिकाधिक विकसित होत गेली. ती काळाच्या प्रत्येक टप्प्यावर बदलत गेली. समकालीन सामाजिक जीवन वास्तवाचे नेमके चित्र कादंबरी लेखनातून साकार झालेले आहे. मानवी समाजजीवन हे मुळातच गुंतागुंतीचे आणि जटील प्रक्रियेतून जाणारे आहे. अशा समाजव्यवस्थेत मानवी समाजात अनेकविध प्रश्न काळानुरूप निर्माण होत गेले आहेत आणि त्या प्रश्नांच्या साद पडसादाचे प्रतिबिंब मराठी कादंबरीत ठळकपणे उमटलेले आहे. साहित्यनिर्मितीच्या काळात जे जे बदल होत गेले त्या त्या बदलांनुसार कादंबरीही बदलत आलेली आहे.

साठोत्तरी काळातील लोकप्रिय साहित्यप्रकार म्हणजे कादंबरी होय. ग्रामीण साहित्य चळवळीचा एक वेगळा विचार प्रवाह मराठी साहित्यात रूढ झाला. त्या विचार प्रवाहाला ग्रामीण कादंबरीकारांनी अत्यंत सशक्तपणे मराठी साहित्यात रूढ केले आहे. ग्रामीण कादंबरीकारांच्या जीवनजाणिवा ग्रामीण कादंबरीतून अत्यंत नेमकेपणाने आलेल्या आहेत. ग्रामीण समाजजीवनात सातत्याने उद्‌भवणारा व एकूणच समाजव्यवस्थेला खिळखिळा करणारा ज्वलंत प्रश्न म्हणजे वर्षा आड वर्ष पडणारा दुष्काळ. या दुष्काळाची त्या त्या काळातील मानवी समाज जीवनावरील परिणामकारकता अनेक ग्रामीण कादंबरीकारांनी शब्दबद्ध केली आहे. ग्रामीण कादंबरीतून साकार झालेल्या दुष्काळ चित्रणाच्या विविधतेचे व वेधकतेचे स्वरूप प्रस्तुत शोधनिबंधाच्या निमित्ताने विचारात घेता येईल.

तसे मराठी साहित्यात ग्रामीण जीवनाचे चित्र हे प्राचीन कालखंडापासून होत आलेले आहे. परंतु ग्रामीणत्वाची नेमकी जाणीव केंद्रस्थानी ठेवून व ग्रामीण संवेदनशीलतेशी प्रामाणिक राहून

लिहिले गेलेले ग्रामीण साहित्य हे प्रामुख्याने साठोत्तरी काळातच आल्याचे दिसून येते. ग्रामीण साहित्याच्या चळवळीने ग्रामीण साहित्याचा सवतासुभा निर्माण केला आणि त्याची मराठी साहित्यात असणारी गरजही दाखवून दिली.परिणामत: ग्रामीण महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लोक लिहिते झाले. सम काळातील जीवघेण्या प्रश्नाला ग्रामीण कादंबरीकारांनी सामाजिक जाणिवेतून अभिव्यक्त केले आहे. लेखकाच्या निर्मितीप्रक्रियेत त्याची सामाजिक जाणीव अत्यंत महत्त्वपूर्ण असते. या सामाजिक जाणीवाशिवाय खरेतर लेखकाला वास्तवाशी सामोरे जाता येत नाही. अशाच समाजजाणीवेची एक परंपरा साठोत्तरी ग्रामीण कादंबरीच्या रूपाने मराठी साहित्यात झालेली दिसून येते. ग्रामीण साहित्यिक आपल्या सभोवतालच्या वास्तवाचे निरीक्षण करून त्यातून आपल्या अभिव्यक्तीला साकार करीत होते. लेखकाचा समकालीन वास्तवाकडे पाहण्याचा दृष्टिकोनच त्याच्या लेखन अभिव्यक्तीचे स्वरूप निश्चित करीत असतो. त्यातूनच त्याच्या लेखनावर समकाळाची मोहर उमटत असते. लेखकाच्या या लेखन प्रक्रियेला अधिक स्पष्ट करताना महेश खरात लिहीतात,''एखादा लेखक वास्तवाकडे जेव्हा पाहतो, तेव्हा त्याच्या पाहण्यावर त्याच्या प्रकृतीचे तत्कालीन सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक वातावरणाचे चित्रणगत आशयाचे स्वीकृत माध्यमाचे ठसे उमटल्याशिवाय राहत नाहीत. त्यामुळे मूळचे वास्तव नष्ट होते असे नव्हे तर ते अधिक संपन्न, संस्कारीत होऊन वेगळ्या पातळीवर जाते. येथे वास्तवतेचा निकष व्यावहारिक वास्तवाच्या अनुषंगाने सिद्ध होत नसून प्रतीतीगोचरतेच्या अंगाने नियत होतो. कलेत पुष्कळदा प्रत्यक्षातील घटित येऊनही ती कलाकृती खोटी वाटते आणि कल्पनेतील घटकांनाही खऱ्याची कळा प्राप्त झालेली दिसते याचे रहस्य यातच आहे.''[१] खरात यांनी लेखकाच्या अभिव्यक्ती प्रक्रियेत समकालीन समाज वास्तवाचे वेगवेगळे पदर कसे प्रतिबिंबित होतात ते स्पष्ट केले आहे.

ग्रामीण कादंबरीतून १९८० नंतर प्रामुख्याने दुष्काळ विषयक चित्रणाची नेमकी जाणीव झालेली दिसून येते. या काळात शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण झाल्यामुळे ग्रामीण भागातील अनेक तरुण शिकू लागले. शिक्षणाने आत्मभान जागे झालेल्या तरुणांना भोगलेल्या आणि अनुभवलेल्या व्यथा—वेदना मराठी साहित्यात नसल्याची जाणीव तीव्र झाली आणि म्हणूनच अशा नवशिक्षित तरुणांनी आपल्या समकाळाला भेटणाऱ्या प्रश्नांना कादंबरीतून मांडले. १९७२च्या कालखंडात महाराष्ट्राच्या एकूणच समाजजीवनात दुष्काळाने भयावह परिस्थिती निर्माण केलेली होती. अशा दुष्काळाचे चटके सहन केलेल्या अनेक ग्रामीण कादंबरीकारांनी आपल्या अनुभवाची मांडणी कादंबरीच्या रुपाने केलेली आहे. या काळात ग्रामीण कादंबरीकाराने म्हणावी तेवढी या परिस्थितीची ओळख कादंबरीतून केली नसली तरी काही मोजक्या कादंबरीकारांनी मात्र या प्रश्नाची तीव्रता दाखवून दिलेली आहे. या काळात लिहिल्या गेलेल्या आणि दुष्काळाचे चित्रण करणाऱ्या कादंबरीविषयी मोहन पाटील म्हणतात,''१९७५ नंतरच्या 'चारापाणी' (रा.रं.बोराडे) या कादंबरीचा अपवाद म्हणून उल्लेख करावा लागेल. तसेच दुष्काळाने मोडून पडलेल्या शेतकऱ्याच्या कुटुंबाची कहाणी मांडणाऱ्या 'शापित' (अरुण साधू) या कादंबरीचाही उल्लेख करावा लागेल. परंतु १९८० नंतर प्रसिद्ध झालेल्या या कादंबरीतून व्यापक, सामाजिक तळमळ प्रकट झालेली दिसून येत नाही. चारापाणीमध्ये जनावरांच्या चारा टंचाईच्या प्रश्नाला मध्यवर्ती स्थान मिळालेले आहे. याठिकाणी स्वाभाविकपणे बनगरवाडी ची आठवण होते. मराठीतील ही एकमेव अशी कादंबरी आहे, तिच्यामध्ये ग्रामीण भागातील प्रलयंकारी दुष्काळाची स्थिती होती. माती आणि माणूस यांच्यातील आदींना त्यासह छोट्याशाच फलकावर व्यापक सामाजिक जाणीवासह चिरंतन वाटेल अशा कौशल्याने चितारली आहे.''[२] पाटील यांच्या या मताचा विचार करताना असे दिसून येते की, या कालखंडात दुष्काळासारख्या महाभयंकर समस्येविषयी काही चार दोन नावे सोडली तर अनेक लेखक या ग्रामीण समस्येकडे पाठ फिरवताना दिसून येतात. परंतु पुढील काळात मात्र दुष्काळासारख्या समस्येचे विविधांगी चित्रण करणाऱ्या अनेक कादंबऱ्या लिहिल्या गेल्याचेही नाकारता येत नाही.

दुष्काळाचे चित्रण करणाऱ्या ग्रामीण कादंबरीची ही परंपरा १९९० नंतर अधिक समृद्ध होताना दिसून येते. दुष्काळाच्या परिणामांना साकार करणाऱ्या ग्रामीण कादंबरीकार आहेत. विश्वास पाटील, सदानंद देशमुख, भीमराव वाघचौरे, रवींद्र शोभणे, कृष्णा खोत, शेषराव मोहिते, सरदार जाधव, सदानंद देशमुख, तानाजी राऊ पाटील, मोहन पाटील, नामदेव माळी, अनिल नवात्रे, कैलास दौंड या आजच्या ग्रामीण कादंबरीकारापर्यंतची परंपरा सांगता येते. या ग्रामीण कादंबरीकारांनी दुष्काळाने उध्वस्त होत गेलेल्या गाव

खेड्याचे विविधांगी दर्शन आपल्या कादंबरी लेखनातून घडविलेले आहे. आधुनिकीकरण आणि सातत्याने पडणारा दुष्काळ यामुळे ग्रामीण माणसाच्या जीवनात खूप मोठी उलथापालथ झालेली होती. या असमतोलातून उद्‌भवलेल्या प्रश्नांना कादंबरीकारांनी चिमटीत पकडण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला दिसून येतो.

महाराष्ट्रात मराठवाडा हा भूप्रदेश खऱ्या अर्थाने दुष्काळी प्रदेश म्हणून ओळखला जातो. या प्रदेशातील लोक प्रामुख्याने शेती व्यवसायावरती अवलंबून आहेत. सतत पडणारा दुष्काळ आणि त्यामुळे वाट्याला येणारी जीवघेणी परिस्थिती या संघर्षाचे चित्रण मराठवाड्यातील अनेक ग्रामीण कादंबरीकारांनी केले आहे. दिवसेंदिवस मराठवाड्यातील ग्रामीण जीवनात निर्माण होणाऱ्या प्रश्नांचे गांभीर्य वाढतच चालले आहे. या विषयी डॉ.सुरेश पैठणकर यांनी केलेले विवेचन अत्यंत महत्त्वाचे वाटते. ''दिवसागणिक मराठवाड्याचे प्रश्न अधिक गंभीर व भयावह होत चालले आहेत. निसर्गाविरुद्ध माणूस वागल्यामुळे पावसाचा वाढता रूसवा, यामुळे पाण्याचा दुष्काळ, शहरांचे बाजूला ठेवूपण, खेड्यातील माणसांची हंडाभर पिण्याच्या पाण्यासाठी चाललेली केविलवाणी धडपड यात ही प्रसिद्धीसाठी लोक नेतृत्वाची स्पर्धा, औद्योगीकरणाच्या नावाखाली शहरालगतच्या सुपीक जमिनीची माफक दराने चालू असलेली विल्हेवाट याचा फायदा आपल्या अक्कलहुशारीने घेणारे भांडवलदार या दलालांची वाढलेली चहती.''[३] असे ग्रामीण जीवन उद्ध्वस्त करू पाहणारे अनेक प्रश्न मराठवाड्यात आ वासून उभे आहेत. या प्रश्नांचा विचार मराठवाड्यातील ग्रामीण कादंबरीकारांनी गांभीर्याने करणे गरजेचे आहे.

आज एकूणच समाज जीवनात जागतिकीकरणाने, आधुनिकीकरणाने, यांत्रिकीकरणाने, तंत्रज्ञानाने खूप मोठा शिरकाव केलेला आहे. ग्रामीण समाज जीवन एका वेगळ्याच संक्रमणाच्या काळात व्यतीत होत आहे. याचा आजच्या ग्रामीण कादंबरीकाराने सखोलतेने विचार करणे गरजेचे आहे. शेती व्यवसाय प्रधान असलेली खेडी आता ओस पडू लागली आहेत. ग्रामीण शेतकऱ्यांची मुले शेताकडे पाठ फिरूवू लागली आहेत. परिणामत: शेती व्यवसाय दिवसेंदिवस विकोपाला जाऊ लागला आहे. याला बदलती समाजव्यवस्था, बदलती शासनव्यवस्था प्रामुख्याने कारणीभूत असलेली दिसून येते. या जीवघेण्या प्रश्नापासून ग्रामीण समाजमनाची सुटका करणे काळाची गरज झालेली आहे. साहित्य हे समाजाचे अविभाज्य अंग असल्यामुळे आजच्या ग्रामीण कादंबरीने खऱ्या अर्थाने एकूण ग्रामीण संस्कृतीला गिळंकृत करू पाहणाऱ्या वास्तवाचा विविधांगी वेध घेणे काळाची गरज झालेली आहे. सर्वच क्षेत्रात अमुलाग्र स्वरूपाचा बदल केला. परंतु, दुष्काळासारख्या संकटावर आजही माणसाला मात करता आलेली नाही. त्याचे विदारक परिणाम समाजाला भोगावे लागत आहेत. दुष्काळामुळे आत्महत्या करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. ही गोष्ट अत्यंत चिंतेची आणि विचार प्रवृत्त करणारी अशीच आहे. या अनुषंगाने ग्रामीण कादंबरीकारांच्या हातून उल्लेखनीय स्वरूपाचे लेखन कार्य होत असल्याचा आशावाद व्यक्त करताना डॉ.नानासाहेब सूर्यवंशी लिहितात,''दुष्काळामुळे ग्रामीण जीवनात अनेक नवनवीन समस्या प्रश्न निर्माण होत आहेत. या नव्या प्रश्नांना सामोरे जाण्याची ताकद ग्रामीण कादंबरीकारात निर्माण होत आहे असे दिसून येते.''[४] बदलत्या ग्रामीण जीवन वास्तवाचा वेध घेण्यास ग्रामीण कादंबरीकार कसे सज्ज होत आहेत. या विषयी नानासाहेब सूर्यवंशी यांनी केलेले विधान महत्त्वाचे आहे. या अनुषंगाने दुष्काळाचे विविधांगी चित्रण या पुढील काळातही ग्रामीण कादंबरीतून साकल्याने होईल असा आशावाद ठेवण्यास हरकत नसावी.

## समारोप :

शेवटी सारांश रूपाने सांगता येते की, साठोत्तरी ग्रामीण समाजजीवनात दुष्काळामुळे निर्माण झालेल्या प्रश्नाला केंद्रस्थानी ठेवून अनेक ग्रामीण कादंबरीकारांनी आपली अभिव्यक्ती सिद्ध केली आहे. दुष्काळाच्या झळा ग्रामीण माणूस सोसतो. हे जगणे असह्य झाले की, तो आत्महत्या करीत आहे. मराठी ग्रामीण कादंबरी दुष्काळाचे, दुष्काळाने उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांचे, शेतीचे वास्तव चित्रण याच काळात होण्यास प्रारंभ झालेला दिसून येतो. परंतु, या दुष्काळामुळे उद्ध्वस्त होऊ पाहणाऱ्या खेड्याच्या वास्तवाला आजच्या ग्रामीण कादंबरीकारांनी सर्वांगाने साकार करणे ही काळाची गरज झाल्याचे दिसून येते.

**संदर्भ :**


१. महेश खरात, ग्रामीण साहित्य आस्वाद आणि आकलन, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, २००८, पृ. २७.
२. मोहन पाटील, ग्रामीण साहित्य आणि संस्कृती, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, दुसरी सुधारित आवृत्ती, २००८, पृ.११४.
३. डॉ.सुरेश पैठणकर, मराठवाड्यातील मराठी कादंबरीची स्वरूप—वैशिष्ट्ये, संपा.दत्तात्रय आघाव व इतर, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, २०१३ पृ.२९.
४. डॉ.नानासाहेब सूर्यवंशी, दुष्काळाचे मराठी साहित्यातील प्रतिबिंब, संपा.शिवाजीराव देशमुख, लक्ष्मी पब्लिकेशन, सोलापुर, प्रथमावृत्ती, २०१६,पृ.७९,८०.